# पिनटकिंग फुट





ह्या शिकवणीत तुम्ही उषा पिनटकिंग फुटचा वापर करणे शिकाल.









कधी विचार केला आहे का की एका वस्त्राला मऊ, नाजूक पिनटक कसे दिले जात असावेत? ते सहजतेने कसे केले जाते, हे ह्या शिकवणीमध्ये आम्ही तुम्हाला दाखवू.

तुम्हाला अजूनही अंदाज बांधता आला नसेल, तर सांगतो, तुम्ही ह्या पाठात उषा जानोम पिनटकिंग फुट वापरायला शिकणार आहात. हा फुट एकमेकांपासून व्यवस्थित अंतरावर असलेल्या समान, समांतर पिनटक शिवण्यास मदत करेल. ह्या फुटच्या मदतीने तुम्ही साध्या पिनटक, तसेच कॉर्डेड पिनटक बनवू शकता.

ह्या पाठाकरिता तुम्हाला जे साहित्य लागतील ते आहेत उषा जानोम पिनटकिंग फुट, एक ट्विन नीडल, कॉटन कॉर्ड नं. 250, एक 8X8" मापाचा चौरस कापडाचा तुकडा, इच्छित रंगांचे धागे, एक फॅब्रिक मार्कर, एक फूटपट्टी आणि एक छोटी कात्री. कापडाच्या तुकड्यावर सुमारे 3 इंच अंतरावर असणाऱ्या समांतर रेघा आखून सुरुवात करा.
रेघांच्या लांबीवरून दोऱ्याची लांबी मोजा आणि एका बाजूने थोडी अधिक लांबी ठेवून दोरा कापा.

हा आहे पिनटकिंग फुट - फुट खाली इथे असलेल्या ह्या अनेक खोबणी बघा, त्यांच्यामुळे तुम्हाला पिनटक्सच्या दोन रेघा, समान अंतर ठेवून बनवता येतात.





सुरुवात करण्याकरिता ट्विन नीडल घ्या - ही द्वि-शूळ सुई असते, जिला एक हेड (डोकं) आणि छिद्र असलेले दोन टोकदार विस्तार असतात. फुट ला नीडल लावताना हेड ची ही सपाट बाजू तुमच्या विरुद्ध दिशेला असेल आणि गोल बाजू तुमच्या दिशेने असेल. हे काळजीपूर्वक पहा.



सुईच्या पकडीचा पेच ढिला करा आणि पहिली सुई काढून ट्विन नीडल आत टाका जेणेकरून गोल भाग तुमच्या दिशेने अशाप्रकारे असेल. पेच घट्ट करा.






साधा प्रेसर फुटच्या जागेवर पिनटकिंग फुट तडकून बसवा. आता ट्विन नीडलमध्ये धागे ओवूया. आपण दोन रंगीत धागे घेऊया, दोन्ही स्पूल पिन्स उचला आणि प्रत्येकात एक-एक धागा ओवा. नंतर दोन्ही धागे गाईड मधून मशीन मध्ये टाका. सुईच्या छिद्रापाशी पोहोचल्यावर दोन्ही धागे वेगवेगळे करा आणि मी केल्याप्रमाणे - एक धागा डाव्या हुकमधून आणि दुसरा धागा उजव्या हुकमधून घाला. धाग्यांचे शेंडे कापून टाका आणि ट्विन नीडलच्या प्रत्येक छिद्रातून एक-एक धागा टाका.




आता तुमची मशीन पिनटक्स बनवण्यासाठी जवळपास तयार आहे. पुढे, फुटमधील फट कापडावरील रेघांच्या रेषेत आणून फुटखाली ठेवा. प्रेशर फुट खाली करा.




मशीनच्या सेटिंग्ज ऍडजस्ट करा - अशाप्रकारे दोऱ्यावर जास्तीत जास्त ताण द्या. पॅटर्न सेलेक्टर वर मशीनला स्ट्रेट स्टिच 'ए' मध्ये सेट करा आणि स्टिच लेंथ 2 वर ऍडजस्ट करा. हळूच सरळ रेषेत शिवायला सुरुवात करा आणि सुंदर पिनटक्स जिवंत होताना बघा.



पिनटक्स बनवत राहण्यासाठी, त्यांची शृंखला तयार करण्यासाठी मुख्य पिनटकच्या आधारे फुटच्या शेवटच्या खोबणीचा वापर करा. तद्नुसार कापड रेषेत ठेवा आणि हळूच शिवायला सुरुवात करा.

हे आहेत साधे पिनटक्स. त्रिआयामी प्रभाव देण्यासाठी आपण कॉर्डेड पिनटक्स शिकूया. ह्यात एक जादा टप्पा असतो, ज्यात तुम्हाला दोरा कपड्याच्या खाली, दुसऱ्या रेघेच्या रेषेत ठेवायचा असतो. फुटखाली कपडा ठेवताना दोरा व्यवस्थित धरल्याची आणि तो फुटच्या मध्यभागी आल्याची खात्री करा.

हळूहळू कपड्याच्या शेवटपर्यंत शिवायला सुरुवात करा. शिवल्यानंतर जास्तीचा कपडा आणि धागा कापून टाका. दोरा मागच्या बाजूने आपोआप जोडल्या जातो.

हळूहळू कपड्याच्या शेवटपर्यंत शिवायला सुरुवात करा. शिवल्यानंतर जास्तीचा कपडा आणि धागा कापून टाका. दोरा मागच्या बाजूने आपोआप जोडल्या जातो.

पिनटक्स विस्मयकारक असतात. त्यांचा वापर विस्मयकारक, कलात्मक समांतर किंवा वक्र रेषा बनवण्यासाठी करता येतो. तुम्ही साध्या कपड्यावर उत्पादकतेने सुंदर वस्त्र तयार करण्यासाठी किंवा कपड्यावर उत्कृष्ट डिझाईन्स तयार करण्यासाठी करू शकता जे प्रत्येक प्रकल्पाला एका छोट्याशा कलाकृतीमध्ये रुपांतरीत करेल. तर मग पिनटकिंगच्या वेगवेगळ्या पद्धतींवर स्वतःला आव्हान द्या... आणि परिणामाइतकाच प्रवासाचाही आनंद घ्या!